## परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय

## शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय अकोला.

जाहिरात २०१९-२०

ऑक्टोबर २०१९ पासून सुरु होणा-या जनरल नर्सिंग व मिडवाईफरी प्रशिक्षणाकरिता पात्र उमेदवाराकडून विहित नमुण्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**प्रवेशासाठी आरक्षणाचा तक्ता**

| प्रशिक्षण संस्थेचे नाव | जात/प्रवर्ग | | | | | | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला | SC अजा | ST अज | VJA विजाअ | NT1 भजब | NT2 भज क | NT-3 भज ड | SBC विमाप्र | OBC इमाव | OPEN खुला | SC BC | EWS | TOTAL | प्रशिक्षणार्थी शा. वै.म. अकोला येथे प्रशिक्षण घेतील |
| | 3 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 4 | | 6 | 2 | 2 | 20 | |

जीएनएम प्रशिक्षणाकरीता ६ पुरुष उमेदवारांची निवड करावयाची आहे.
त्याअनुषंगाने खुला-२, सामाजीक व शैक्षणिक मागासवर्ग व दुर्बल घटक-१
अ.जा-१, इमाव व विशेष मागास प्रवर्ग -२ , उमेदवाराची निवड गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

**प्रशिक्षणाचा कालावधी** :- शैक्षणीक अभ्यासक्रमाची सूरुवात झाल्यापासून ३ वर्ष.

**वयोमर्यादा** :- प्रवेश वर्षी दिनांक ३१ डिसेंबर २०१९ रोजी उमेदवाराचे वय १७ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**शैक्षणीक पात्रता :-**

०१)उमेदवार महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (१०+२) अथवा समतुल्य परिक्षा शासनमान्य संस्थेमधून प्राधान्याने फिजीक्स, केमेस्ट्री व बायोलॉजी या शास्त्र विषयासह कमीत कमी ४०% गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

०२)वरीलप्रमाणे आवश्यक पात्रता धारण करणारे उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध झाले नाहीतर महाराष्ट्र राज्य उच्चमाध्यामिक परिक्षा मंडळाची कोणत्याही शाखेची आणि कोणत्याही विषयातील उच्च माध्यामिक परिक्षा (१०+२) कमीत कमी ४०% गुणांनी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा प्रवेशाचा विचार करण्यात येईल.

०३)वरील प्रमाणे शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवाराने १२ वी ची परीक्षा जास्तीत जास्त तीन प्रयत्नात उतीर्ण केलेली असावी. तीन पेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झालेले उमेदवार अर्ज करण्यास अपात्र आहेत.

०४)पहिल्या प्रयत्नानंतर उत्तीर्ण झालेल्या प्रत्येक प्रयत्नासाठी १२ वी ला मिळालेल्या गुणातुन ५ गूण कमी करण्यात येतील.

०५)विहित नमुण्यातील अर्ज **परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय ट्रेनिंग सेन्टर इमारत दुसरा मजला,उपहार गृहाच्या समोर ,शासकिय वैद्यकिय महाविद्यालय अकोला**. येथे विहित शुल्क (खूला संवर्ग १००/- रु. व आरक्षित संवर्ग ५०/- रु) भरुन सुटीचे दिवस वगळता सकाळी १० ते सांय ५.००वा.पर्यत दिनांक २६/ ०९ /२०१९ ते ०१ / १० /२०१९ या कालावधीत मिळतील.

०६)संपूर्णपणे भरलेले अर्ज दि २६/ ०९ /२०१९ ते ०१ / १० /२०१९ सकाळी १० ते ३.०० वा. पर्यत

स्विकारले जातील. या मुदतीनंतर स्वहस्ते किंवा टपालाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

०७)अर्धवट भरलेले, त्रृटी असलेले व उशिरा प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

०८)या अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेल्या जागांतून सहाय्यकारी परिचर्या प्रसविका (Auxilliary Nurse Midwifery)अभ्यासक्रम उत्तीण असलेल्या उमेदवारांसाठी १ जागा राखीव राहील.

०९)पुरुषाचे १०:३ या प्रमाणानूसार ६ पुरुष उमेदवारांची निवड करण्यात येईल.

१०)अकोला शी संबंधीत महसूल विभागातील (अकोला,अमरावती,यवतमाळ, बुलढाणा व वाशिम या जिल्हयातील)पुरुष व स्त्री उमेदवाराचे अर्ज स्विकारण्यात येतील.

११) अंपगव्यक्ती (समान संधी,संपुर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण)शासन निर्णय क्र.एमईएस १२०२/(८१)वैसेवा-१मंत्रालय,मुं ३२ दिनांक १९ऑगस्ट२००५ मधील तरतुदीनुसार ३ टक्के जागा आरक्षीत राहतील. त्यानुसार १ पायाने अपंग असलेला व ऑनलाईन अपंगत्व प्रमाणपत्र धारक असलल्या उमेदवाराची निवड करण्यात येईल. सदर जागेकरीता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारामधुन भरण्यात येतील.

**१२) सामाजीक शैक्षणिक मागासवर्ग या प्रवर्गातुन दोन उमेदवार व आर्थीक दुष्टया दुर्बल या घटकातुन दोन उमेदवार निवड केल्या जातील. व या चार उमेदवारामधुन एका पुरुष उमेदवाराची निवड करण्यात येईल.**

१३)उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती व सोबत जोडलेल प्रमाणपत्र सत्य असल्याबाबतचे प्रतीज्ञालेख अर्जासोबत
जोडणे आवश्यक राहील.सदर कागदपत्र बनावट व माहिती असत्य आढळल्यास निवड प्रकियेच्या कोणत्याही
टप्प्यावर उमेदवारास अपात्र ठरवुन निवड प्रक्रियेतुन बाहेर काढण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोद घ्यावी.

**१४)प्रवेश प्रक्रिये संबधीत सर्व सुचना कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येतील.सदर सुचना पाहण्याची जबाबदरी उमेदवाराची राहिल.त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार या कार्यालयामार्फत करण्यात येणार नाही.**

१५)प्रवेशासंबंधी इतर अटी शर्ती प्रवेश अर्जा सोबत पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तकात देण्यात आलेली आहेत.

१६)निवड प्रक्रियेसंबधी कूठल्याही मुद्यांवर निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१७)सदर जाहिरात शासकिय वैद्यकिय महाविद्यालय सर्वोपचार रुग्णालय अकोला यांचे संकेत स्थळ http://www.gmcakola.in वर उपलब्ध राहिल

23/09/19

| | | |
|---|---|---|
| **सभापती (निवड समिती)**<br>**शा.वै.म.व.स.रु.अकोला.** | **सदस्य**<br>**शा.वै.म.व.स.रु.अकोला.**<br>विभागप्रमुख शरीरक्रिया शास्त्र | **अधिष्ठाता**<br>**शा.वै.म.व.स.रु.अकोला.** |
| **सदस्य**<br>**प्रशासकीय अधिकारी**<br>**शा.वै.म.व.स.रु.अकोला.** | 23/9/2019<br>**सदस्य**<br>**अधिसेविका**<br>**शा.वै.म.व.स.रु.अकोला.** | **सदस्य/सचिव**<br>**प्राचार्या**<br>**शा.वै.म.व.स. अकोला.** |